लोकमत दि 11/04/2023

# हॉस्टेलवर दरोडा टाकणारी टोळी जेरबंद

## पिस्टल आणि तलवारीच्या धाकावर लुटले होते विद्यार्थ्यांना



लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : शहरातील भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत मुलांच्या हॉस्टेलवर अज्ञात आरोपींनी दरोडा घातला होता. यावेळी विद्यार्थ्यांना मारहाण करून लुबाडण्यात आले होते. या प्रकरणातील चार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने छापा मारून पकडले आहे. तर गुन्ह्यात एकूण सात जणांचा समावेश आहे. आरोपींकडून पोलिसांनी तलवार, खंजर, मोबाइल जप्त केला.

नांदेड शहरात राज्यभरातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोईसाठी अनेकांनी हॉस्टेलही सुरू केले आहेत. भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अशाच एका हॉस्टेलवर अज्ञात आरोपींनी दरोडा घातला होता. यावेळी बंदूक आणि तलवारीचा धाक दाखवून विद्यार्थ्यांकडील मोबाइल आणि रोख रक्कम काढून घेण्यात आली होती. या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये दहशत पसरली होती. या प्रकरणात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. द्वारकादास चिखलीकर यांच्या नेतृत्वातील पथकाने गुन्हेगारांची माहिती मिळविली. मामा हॉटेलच्या पाठीमागे एका खोलीवर पथकाने छापा मारून चार जणांच्या मुसक्या आवळल्या. या पथकात पोउपनि गोविंद मुंडे, जसवंतसिंह शाहू, पोउपनि दत्तात्रय काळे, सखाराम नवघरे, रूपेश दासरवार, शंकर म्हैसनवाड, दीपक पवार, शंकर केंद्रे, गंगाधर घुगे यांचा समावेश होता.

### आरोपींमध्ये यांचा समावेश

- अंकुश दीपक पंडित रा. नेरली, सूरज अर्जुन शिंदे रा. कांदेमामा बिल्डिंग, सूरज महेंद्र हिंगोले रा. कासारखेडा, निखिल रमेश घोरपडे रा. वसरणी, अक्रांत अशोक खंडाखुळे रा. नेरली, गौतम सखाराम हटकर रा. नेरली आणि जसपालसिंघ दिवानसिंघ संधू रा. शहिदपुरा या सात जणांनी हा दरोडा घातला होता.